आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद
# School Leadership Academy, Maharashtra
# मोड्यूल क्र.२९
# "कोविड 19 च्या कालावधीमध्ये शैक्षणिक स्थित्यंतराशी समायोजन साधण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका"
# The Role of School Leadership in Adjusting to the Educational Transition during Covid-19 Period

**प्रस्तावना -**

"शिक्षण हे एकमेव उन्नतीचे साधन आहे" असे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. याचा प्रत्यय सतत दिसून येतो नुकतीच कोरोना ह्या जागतिक संकटामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी अस्वस्थता निर्माण झाली. विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. आज आपला भारत देश प्रगतीच्या उच्च शिखराकडे वाटचाल करत असताना कोरोना विषाणूने संकट जगभर थैमान घातले. या विषाणूने सर्वच क्षेत्रात मोठ्या अडचणी निर्माण केल्या. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मार्च २०२० पासून संपूर्ण देशात लॉकडाऊन करण्यात आले. शाळा, महाविद्यालये यांना सुट्टी देण्यात आली. दरम्यानच्या काळात कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये विद्यार्थी हा शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहू नये, म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग निवडण्यात आला.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -**

- कोविड 19 च्या कालावधीमध्ये शैक्षणिक स्थित्यंतराशी समायोजन साधण्यासाठी शाळास्तरावर शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
- शैक्षणिक स्थित्यंतराशी समायोजन साधतांना यश प्राप्त केलेल्या मुख्याध्यापकांच्या कार्याचा अभ्यास करणे.
- "कोविड 19 च्या कालावधीमध्ये शैक्षणिक स्थित्यंतराशी समायोजन साधण्यासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.

लॉकडाऊनमुळे शाळांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. अनेक महिने शाळा बंद असल्याने, जगभरात ई-लर्निंग सुरु झाले. शाळा आणि शिक्षकांना पारंपारिक शिक्षण पद्धती सोडून ई-लर्निंगशी जुळवून घेण्याशिवाय पर्याय नव्हता. ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारी सर्व साधने शहरातील तथा मध्यमवर्गीय शिक्षीत पालकांच्या मुलांकडे आहेत. परंतु ग्रामीण भागातील गरीब शेतकरी कष्टकरी अशिक्षित पालकांच्या मुलांकडे आजही ऑनलाईन शिक्षणाची सुविधा अत्यल्प स्वरुपात उपलब्ध आहे.

**कोविड 19 च्या कालावधीमध्ये शैक्षणिक स्थित्यंतर व समायोजन बाबत सांख्यिकीय माहिती -**

कोविड-19 महामारीने जग हादरले आहे. मानवी जीवनाच्या सर्व पैलूंना शिक्षणासह त्याचे परिणाम जाणवतात. शालेय कृतींची जागा घरबसल्या ऑनलाइन शिक्षणाने घेतली आहे आणि शिक्षक आता पालकांसोबत शिकवण्याचे ओझे सामायिक करत आहेत. या परिस्थितीला तोंड देताना पालकांनी घरातील मुलांचे शिकण्याचे साथीदार म्हणून भूमिका बजावली पाहिजे. खरं तर, सर्व पालक या नवीन कार्यासाठी तयार नाहीत. ट्राय" च्या अहवालानुसार भारतात २०२० मध्ये इंटरनेट वापरणाऱ्याची संख्या ६८.४६ कोटी आहे मोबाईल फोन वापरणार्यांची संख्या ४८.८२ कोटी आहे तर इंटरनेटसह स्मार्ट फोन वापरणाऱ्याची संख्या ४०.७२ कोटी आहे तर T.V पाहणाऱ्यांची संख्या ७६ कोटी इतकी आहे हा माहिती तंत्रज्ञानाचा विस्तार झालेला दिसत असला तरी त्यात प्रचंड प्रमाणात विषमता आहे भारतात ५२% जनता इंटरनेटचा वापर करते म्हणजे निम्मा भारत आजही इंटरनेटच्या लाभापासून वंचित आहे ग्रामीण भागात ३६% जनता व शहरात ६४% जनता इंटरनेटचा वापर करते तर ६७% पुरुष व ३८% स्त्रिया भारतात इंटरनेटचा वापर करतात. "नॅशनल डिजिटल लायब्ररी", "स्वयम ", "शोध गंगा", इ. सरकारी प्रकल्पांचा फायदा मर्यादित होत आहे या प्रकारच्या ऑनलाईन शिक्षणात कम्प्युटरची किंमत, इंटरनेटचा खर्च, विजेचा पुरवठा. इ. प्रमुख अडचणी आहेत.

**यशोगाथा**

**जिल्हा परिषद शाळा नींबी बु.,**

**ता.बार्शीटाकली,जि.अकोला**

**श्री देवेन्द्र खंडारे**

कोरोना काळात सगळीकडे शालेय शिक्षणाची गती मंदावली होती. यास निंबी शाळाही अपवाद नव्हती. या काळात शाळेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

- **कोरोना काळातील मुलांच्या शिक्षणातील आव्हाने –**
- प्रत्यक्ष अध्यापन करणे अशक्य
- विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या मनात कोविड विषयी भीती.
- इंटरनेट व मोबाईलचा अभाव.
- विद्यार्थ्यांची गुणवत्ता टिकवणे कठीण.
- नियमित अभ्यासक्रम पूर्ण करणे कठीण.
- नवीन तंत्राचा उपयोग करणे शिक्षकांना आवश्यक

- इंटरनेट व मोबाईलचा अभाव.
- विद्यार्थ्यांची गुणवत्ता टिकवणे कठीण.
- नियमित अभ्यासक्रम पूर्ण करणे कठीण.
- नवीन तंत्राचा उपयोग करणे शिक्षकांना आवश्यक.

**कोरोना कालावधीत निंबी शाळेत सकारात्मक बदल करण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका –**

**मुलांच्या शिक्षणासाठी मिळालेला पालकांचा सहभाग**

मोफत साहित्य वाटप करताना पालकांकडून सहा हजार रुपयाचे सहकार्य मुख्याध्यापकांना करण्यात आले.याशिवाय मोफत स्वाध्याय पुस्तिका वाटप करत असताना एकूण रक्कम 14000 रुपये होती त्यापैकी शिक्षकांनी सात हजार रुपये शिक्षकांनी तसेच पालकांनी सात हजार रुपये रक्कम उभी केली.

शालेय परिसर सुरक्षित राहण्यासाठी शालेय कुंपणाची आवश्यकता होती .यासाठी एक लाख 40 हजार रुपये किमतीचे शालेय कुंपण व गेट यासाठी शिक्षकांनी प्रत्येकी तीस हजार रुपये जमा करून तयार केले आणि शाळेला सहकार्य केले. कोविड काळात विद्यार्थी पूर्णवेळ घरी असल्यामुळे त्यांना अवांतर वाचन करण्याची सवय लागण्यासाठी बालवाचनालयाची निर्मिती करण्यात आली .यासाठी गावातील सरपंच व सदस्यांच्या पुढाकारातून नऊ हजार रुपये किंमतीचे पुस्तके व सहा हजार रुपये किंमतीचे कपाट शाळेला उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना बालवाचनालयाचा लाभ उपलब्ध करून देता आला.पालकांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाप्रमाणे स्वाध्याय पुस्तिका सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना सहकार्य केल्याने 100% विद्यार्थ्यांचा अभ्यास पूर्ण करून घेणे शक्य झाले.पालकांच्या सहकार्यातूनच विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करून घेणे शक्य झाले.





**कोरोना कालावधीत शंभर टक्के मुले शिकवीत यासाठी केलेले प्रयत्न**

**ऑनलाईन उपक्रम**

- गुगल मीट द्वारा शिक्षण
- Read along अॅपचा वापर .
- युट्युब चॅनेल .
- ऑनलाइन स्वाध्याय .
- ऑनलाइन शैक्षणिक कृती व उपक्रम .
- ऑनलाइन विविध स्पर्धांचे आयोजन .
- टीव्हीवरील कार्यक्रम

**ऑफलाइन उपक्रम**

- विद्यार्थी समूह गट अध्यापन .
- विद्यार्थी समूह गट अध्यापन .
- पालकांना गृहभेटी द्वारा मार्गदर्शन.
- मोफत स्वाध्यायीका वाटप .
- शालेय परिसरात विद्यार्थ्यांच्या गटाला मार्गदर्शन .
- मोफत लेखन साहित्य वाटप .

ऑनलाइन किल्ले बांधणी स्पर्धा.

**शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी केलेले प्रयत्न व त्याची फलनिष्पत्ती**

- व्हाट्सअप द्वारे अध्यापनाचे तंत्र शिक्षकांना अवगत करून देण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.
- विविध स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे तंत्र अवगत करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली.
- गूगल मीटचा वापर अध्यापनात कसा करावा याबाबत सविस्तर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.
- युट्युब चा विविध उपक्रम व कृतीसाठी वापर करण्यासाठी शाळेचे यूट्यूब चैनल तयार करण्यात आले . त्याचा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.
- गुगल व्हाईस टाईप व गुगल डॉक चा वापर अध्यापनासाठी कसा करावा यासाठी शिक्षकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.
- विविध e-content ची निर्मिती करून अध्यापनात वापर कसा करावा. यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच त्याच्या प्रत्यक्ष वापरावर भर देण्यात आला.


सकाळ

स्वखर्चातून बांधली आवारभिंत

जि. प. शाळा निंबीच्या शिक्षकांचा आदर्श

शालेय लोकसहभाग


किल्ले बांधणी स्पर्धा व शिवकालीन चित्र प्रदर्शनातून कोरोना लसीकरण जनजागृती कार्यक्रम

जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा निंबी बु चे उपक्रम

सहशालेय उपक्रम

**शाळेने केलेले उल्लेखनीय कार्य**

- राज्यस्तरावरील बालदिनाच्या स्पर्धेमध्ये 16 विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्राप्त झाले.
- बालदिन स्पर्धेत तालुकास्तरावर सहा विद्यार्थ्यांना पुरस्कार प्राप्त झाले आहेत.
- सकाळ बाल चित्रकला स्पर्धेमध्ये 30 विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग दिला व सन्मानपत्र प्राप्त केले.
- विदर्भ कला संघ, अकोला यांच्या ऑनलाइन चित्रकला स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर एका विद्यार्थिनीची निवड करण्यात आली.
- नवोपक्रम स्पर्धेमध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री खंडारे सर यांना जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक मिळाला आहे.
- इंस्पायर अवार्ड साठी एका विद्यार्थिनीच्या प्रतिकृतीची निवड झाली.
- शालेय कुंपण निर्मिती या उपक्रमाची विविध वृत्तपत्र चॅनल यांनी दखल घेऊन प्रसिद्धी दिली.

- ऑनलाईन स्वाध्याय मध्ये विद्यार्थ्यांचा शंभर टक्के सहभाग असल्यामुळे तालुकास्तरावर प्रशंसा व सन्मान करण्यात आला.
- शालेय यूट्यूब चैनल वर 500 पेक्षा अधिक व्हिडिओ विद्यार्थ्यांनी तयार करून अपलोड केले आहेत. त्यामुळे त्याचा अध्ययन अध्यापनासाठी वापर करण्यात आला.
- कोविड काळात चार विद्यार्थ्यांनी संविधानातील 395 कलमी पाठ करून त्याचे व्हिडिओ बनविण्यात आले त्यामुळे जिल्हास्तरावर सुद्धा या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.
- विद्यार्थ्यांना इतिहासाचे ज्ञान आनंददायी पद्धतीने देण्यासाठी ऑनलाइन किल्ले बांधणी स्पर्धा घेण्यात आली
- कोविड काळातील उत्कृष्ट कार्यामुळे शाळेचा तालुकास्तरावर प्रथम क्रमांक व जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे .तसेच विभाग स्तरावर शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.
- अशाप्रकारे शाळेतील उत्तम नेतृत्व विकासाच्या माध्यमातून शाळेमध्ये विविध शैक्षणिक समाज सहभागाचे व गुणवत्ता पूर्ण अशी उपक्रम राबवले यामुळे शाळेची यशस्विता जिल्ह्यामध्ये निर्माण करता आली.




**विद्यार्थी शिक्षक आंतरक्रिया**

 

सामाजिक अंतर ठेऊन मुलांचे अध्ययन

**विचार करूया आणि चर्चा करूया**

- विद्यार्थ्यांना त्यांच्या कोविड 19 च्या कालावधीमध्ये शैक्षणिक स्थित्यंतर, समायोजन व इतरही अशा प्रकारच्या शैक्षणिक स्थित्यंतरानुसार शाळास्तरावरील शालेय नेतृत्वाने कोणती भूमिका घेणे आवश्यक आहे.
- मुलांच्या बाबतीत अशा प्रकारच्या शैक्षणिक स्थित्यंतरे भविष्यात निर्माण झाल्यास शाळास्तरावर शालेय नेतृत्वाने कोणकोणत्या संधीची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे .

**कोविड काळात शालेय शिक्षणात गतीमानतेसाठी झालेले प्रयत्न :**

**पीएम ईविद्या:** पीएम ईविद्या उपक्रमांतर्गत डिजीटल/ऑनलाईन/ऑन-एअर शिक्षणासाठी बहुविध पद्धती राबवण्यात आल्या. या उपक्रमांतर्गत पुढील बाबींचा समावेश आहे:

**दीक्षा (माहितीच्या देवाणघेवाणीसाठी डिजीटल पायाभूत सुविधा)**

राष्ट्रीय प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून इयत्ता 1 ते 12 वी च्या विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण उपलब्ध करुन देण्यात आले आहे. शालेय शिक्षणासाठीचा हा 'एक राष्ट्र, एक डिजीटल' प्लॅटफॉर्म आहे.

एप्रिल 2020 मध्ये **विद्यादान** ची सुरुवात करण्यात आली. शैक्षणिक संस्था, खासगी संस्था आणि तज्ज्ञांकडून ई-लर्निंग स्रोतांमध्ये योगदान देण्यासाठीचा प्लॅटफॉर्म.

- शिक्षण विभागाने दीक्षा ॲप ची निर्मिती केली आहे. त्यासाठी भारतातील सर्व सृजनशील शिक्षकांनी घटकांची मांडणी त्या ॲप वर अपलोड करून ॲप अधिक स्टुडंट फ्रेंडली करण्यात आले. हे ॲप प्रत्येक पालकाने त्यांच्या स्मार्टफोनमध्ये डाऊनलोड करून त्यांच्या मुलांना रोज 45 मिनिटे अभ्यासण्यास द्यावे असे अपेक्षित आहे. या ॲपवर स्वयम अध्ययनासाठीचे भरपूर वर्कशीट उपलब्ध आहेत.

- शाळा व्यवस्थापनाने दीक्षा ॲपचा वापर करण्याबाबत माहिती देऊन मुलांचा ऑनलाईन स्क्रीन टाईम वयोगटानुसार दोन तासापेक्षा जास्त नसावा.
- शालेय शिक्षणाअंतर्गत सर्व पाठ्य पुस्तके वेबसाईटवर उपलब्ध करून दिलेली आहेत. ज्याचा वापर मुलांनी आवश्यकतेनुसार करावा.
- गुगलक्लासरूम प्लॅटफॉर्मचा वापर करून विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिकवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.
- अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांचे व्हाट्सअप ग्रुप तयार करून शिक्षकांना ॲडमिन करून स्वाध्याय गृहकार्य व अभ्यास तपासण्याची सोय करण्यात आली.
- महाराष्ट्रात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी कोविड काळात अभ्यासमाला,शैक्षणिक दिनदर्शिका शैक्षणिक व्हिडिओ अंतर्गत यु ट्यूब चा वापर अशा अनेक उपाय योजना करण्यात आल्या ज्यातून विद्यार्थ्यांचे शालेय हित जोपासले जावे हा प्रमुख हेतू होता.

**कोविड -१९ काळात शैक्षणिक स्थित्यंतराशी समायोजन साधण्यासाठी मुख्याध्यापकांना असेही करता येईल.**

- विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या मनात कोविड विषयी भीती कमी करण्यासाठी सतत संवाद साधणे.
- शाळेमध्ये इंटरनेट सुविधा मिळवण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ, पालक यांचे सहकार्य घेणे.
- विद्यार्थ्यांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी कृती आधारित उपक्रम सुरु करणे.
- नवीन तंत्राचा उपयोग करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण व प्रोत्साहन देणे तसेच या संदर्भातील अडचणी सोडविणे.
- राष्ट्रीय व राज्य स्तरावरून ऑनलाईन शिक्षणाबाबत सुरु असलेले उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पाठपुरावा करणे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये संबंधित समस्या दूर करण्यासाठी केलेला विचार**

शिक्षकांची अध्यापनाबाबतची पूर्वतयारी व विकास यांच्या साहाय्यार्थ अध्यापन अध्ययन व मूल्यमापन पद्धती सुधारणे, वंचित गटांना मिळणारी शिक्षणाची सुविधा वृद्धिंगत करणे आणि शैक्षणिक नियोजन प्रशासन व्यवस्थापन यांच्यात सुसुत्रता आणणे अशा बाबींकरिता शिक्षणाच्या सर्व स्तरामध्ये तंत्रज्ञानाचा समावेश करणे.

१) अध्यापन अध्ययन व मूल्यमापन पद्धती सुधारणे.

२) शिक्षकांची अध्यापनाबाबतच्या पूर्वतयारीस व त्यांच्या निरंतर व्यावसायिक विकासास साहाय्य करणे.

३) वंचित गटांना मिळणारी शिक्षणाची सुविधा वृद्धिंगत करणे आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन व व्यवस्थापन यांच्यामध्ये सुसूत्रता आणणे अशा बाबींकरिता शिक्षणाच्या सर्व स्तरांमध्ये तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात येत असल्याबाबतची दक्षता घेणे याबाबत धोरणात नमूद केले आहे.

या उद्देशाने राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच (नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम) नावाच्या स्वायत्त संस्थेची स्थापना करण्यात येईल. यासाठी शैक्षणिक संस्था, राज्य शासन व केंद्र शासन यांचे नेतृत्व आणि इतर भागधारक (स्टेकहोल्डर्स) यांना अद्ययावत ज्ञान व संशोधन पुरवून त्यासोबत एकमेकांकडे असलेल्या सर्वोत्तम कार्यपद्धतीविषयी एकमेकांशी सल्लामसलत व देवाणघेवाण करण्याची संधी देण्यात येईल. आ. अंकीय संग्रह (डिजिटल रिपॉझिटरी) तंत्रज्ञानाच्या विनियोगाबाबत शिक्षकाची तयारी, योग्यताप्राप्त साहाय्य व संशोधन यांच्याद्वारे तंत्रज्ञानाचा शैक्षणिक

प्रक्रियांमध्ये (उदा. अध्यापनशास्त्रामध्ये साधन या अर्थी भाषांतराचे साहाय्य, निरंतर व्यावसायिक विकास घडविणे व ऑनलाईन कोर्सेस इत्यादी पुरविणे) समावेश करण्यात येईल. संशोधनकार्यासाठी व तंत्रज्ञानाच्या विनियोगास समुचित साहाय्य व्हावे याकरिता शैक्षणिक तंत्रज्ञानामध्ये उत्कृष्टता केंद्रांची (सेंटर्स ऑफ एक्सलन्स) स्थापना करण्यात येईल. शैक्षणिक माहितीच्या राष्ट्रीय संग्रहामध्ये (नॅशनल रिपॉझिटरी ऑफ एज्युकेशनल डेटा अंकीय स्वरूपात संस्था) शिक्षक व विद्यार्थ्यांची सर्व इत्यंभूत माहिती जतन करण्यात येईल.

**शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून मोड्यूलची उपयुक्तता -**

शिक्षक प्रशिक्षणामध्ये आजपर्यंत मुलांच्या कोविड च्या कालावधीमध्ये शैक्षणिक स्थित्यंतरे, समायोजन व इतरही अशा प्रकारच्या शैक्षणिक स्थित्यंतरानुसार या क्षेत्रातील शिक्षणाबाबतच्या समस्यांवर आजपर्यंत कमी प्रमाणात विचार करण्यात आलेला आहे असे निरीक्षणातून दिसून येते. सदर मोड्यूल चा उपयोग अशा प्रकारच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या नेतृत्वाला तर होईलच पण इतर क्षेत्रातील शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.या मोड्यूल मुळे पुढील परिणाम साधता येतील.

- शिक्षण हक्क कायदा २००९ ची यशस्वी अंमलबजावणी.
- प्रत्येक विद्यार्थ्यांचा शिक्षण हक्क बाधित होऊ न देता शिक्षण प्रक्रिया.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी उपक्रम.

**संदर्भ साहित्य –**


- शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद.
- राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०
- निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार डिसेंबर २०१९, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.
- संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे,जानेवारी २०१८ , शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य.
- महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था ( मिपा ) औरंगाबाद संस्थेचे ४ मोड्यूल.
- Hand book of NIEPA NEW DELHI.
- https://www.youtube.com/watch?v=ESb9_To0M1o



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| डॉ जितेंद्र वि.काठोळे | डॉ.ज्योती कुलकर्णी | श्री.रमाकांत काठमोरे |
| विषय सहायक | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,अकोला | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |